महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+४+४ (ऑक्सिजन) = २०, किंमत : ₹ ५.००
सातारा, गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२०

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# डी. पी. भोसले महाविद्यालयात ट्रेड फेअर डे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरेगाव :** विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक सक्षमता, मार्केटिंग, ग्राहक संबंध, विक्री-संवादकौशल्ये व उद्योजकता निर्माण व्हावी, या हेतूने रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्यावतीने 'ट्रेड फेअर डे' आयोजित करण्यात आला. या महोत्सवाला भरभरून प्रतिसाद मिळाला.

यात विद्यार्थ्यांच्या खाद्यपदार्थ व विविध वस्तूंच्या विक्रीचे स्टॉल प्रदर्शन भरवण्यात आले. या महोत्सवाचे उद्‌घाटन इंग्लिश मॉडर्न ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एस. टी. चव्हाण, कातरेश्वर हायस्कूल, खटावचे मुख्याध्यापक डी. ए. लोहार आदी मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांकडून विविध वस्तूंचे ४० स्टॉल्स लावण्यात आले. यात महाराष्ट्रीयन, पंजाबी, गुजराती, मालवणी, राजस्थानी आदी विविध प्रांतीय खाद्यपदार्थांचा समावेश होता.

या महोत्सवाचे आयोजन प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डी. डी. पाटील, डॉ. एस. एस. पवार, प्रा. बी. एस. गायकवाड व विभागातील सहकारी प्राध्यापक यांनी केले.